सिटी न्यूज
दिव्य मराठी नाशिक, गुरुवार, १५ डिसेंबर २०२२

**सुरक्षा धोरण • लेफ्टनंट जनरल विनोद खंदारे यांचे प्रतिपादन**

# सायबरसह युद्धाच्या विविध नव्या पद्धतींमुळे भारतासमोर नवी संकटे

**धर्मवीर डॉ.बा.शि.मुंजे व्याख्यानमालेचा समारोप**

## कॉम्प्रेहेन्सिव्ह नॅशनल सिक्युरिटी अँण्ड आत्मनिर्भयता विषयावर संवाद





प्रतिनिधी | नाशिक

सीमांवरील सुरक्षिततेसाठी आपले सैनिक सज्ज आहेत, ते आव्हानांचा यशस्वीपणे सामना करत आहेत. मात्र सायबरसह सायकॉलॉजिकल, स्पेस, केमिकल, बायोलॉजिकल (वॉरफेअर)द्वारे होणाऱ्या हल्ल्यांना परतवून लावणे हे भारतासमोरील मोठे आव्हान आहे, या नव्या पद्धतींमुळे आपल्यासमोर संकट उभे राहिले असल्याचा संवाद लेफ्टनंट जनरल विनोद खंदारे साधला.

सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटीतर्फे घेण्यात येत असलेल्या धर्मवीर डॉ. बा. शि. मुंजे व्याख्यानमालेचे अखेरचे पुष्प लेफ्टनंट जनरल विनोद खंदारे (पीव्हीएसएम, एव्हीएसएम, एसएम) यांनी गुंफले. 'कॉम्प्रेहेन्सिव्ह नॅशनल सिक्युरिटी अँड आत्मनिर्भयता' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. संस्थेच्या नाशिक विभागाचे अध्यक्ष कॅप्टन श्रीपाद नरवणे, लेफ्टनंट जनरल (निवृत्त) आरोग्यविज्ञान विद्यापीठाचे जनरल (निवृत्त) सायरस पिठावाला हे व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी खंदारे म्हणाले, जय हिंद याचा अर्थ देशाभिमान असणे किंवा नेहमी विजयाच्या मार्गावर वाटचाल करणे, राष्ट्रीय सत्ता सहभाग (नॅशनल पॉवर), राष्ट्रीय सुरक्षितता (नॅशनल सिक्युरिटी) आणि राष्ट्रीय कार्यात सहभाग (नॅशनल इंटरेस्ट) हे तिन्ही शब्द प्रत्येक देशासाठी महत्त्वाचे शब्द आहे. नॅशनल इंटरेस्ट हा देश, राष्ट्राशी संलग्न आहे. आपली ज्यावेळेस अंतर्गत आणि बाह्य ताकद वाढते, आपण सक्षम होतो तेव्हा नॅशनल पॉवर होते. प्रत्येकाचे कर्तव्य आहे की आपल्या देशाची नॅशनल पॉवर वाढविण्याबरोबरच नॅशनल सिक्युरिटी जपणे हे अत्यंत आवश्यक आहे. राष्ट्रीय सुरक्षिततेकडे दुर्लक्ष केले त्याचा परिणाम हा चीनविरुद्ध १९६२ ... आले. १९६५ च्या काळात पाकिस्तानला वाटले की आपण भारताच्या काही भागावर कब्जा करू शकतो, या काळात आपण योग्य पद्धतीने तडजोड (बार्गेनिंग) करू शकलो नाही. यावेळी त्यांनी लालबहादूर शास्त्री यांचे उदाहरण दिले. अन्नधान्याचा मुद्दा सैनिकी सुरक्षिततेच्या दृष्टीने पुढे आला तेव्हा आपण आठवड्यातून एक दिवस उपवास करू शकतो का, हे ठरले. तांत्रिकदृष्ट्या आपण सुरक्षिततेच्या दृष्टीने कमकुवत ठरत होतो. १९६७-१९७१ या कालावधीत झालेल्या युद्धातील विजयाने भारताची मान उंचावली. १९८९, १९९१ शीतयुद्धाचाही मुद्दा पुढे आलेला दिसतो. अंतर्गत सुरक्षिततेइतकीच बाह्य सुरक्षितता महत्त्वाची असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. ईशान्येकडील भागातील चकमकी याकडेही आपल्याला ... करतो तेव्हा स्थानिक, राज्य, केंद्र आणि सैनिकी खात्याचे सुरक्षा अधिकारी यांच्या बाबींचा विचार करायला हवा. माओवाद्यांकडून वैयक्तिकस्तरावर होणारे हल्ले चकमकी हे सुद्धा आपण लक्षात घेतले पाहिजे. आरोग्याचा विचार केला तरी या मुद्यांकडे आपल्याला दुर्लक्ष करता येणार नाही. अगदी पशुपतीनाथ ते तिरुपतीपर्यंतच्या भागाचा विचार करावा लागेल.

वाढता भ्रष्टाचार, विभक्तीकरण, असुरक्षिततेचे वातावरण याकडे प्राधान्याने पहावे लागेल, हे सांगताना त्यांनी घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उदाहरण दिले. कॅप्टन नरवणे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. सौ. स्नेहा कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. शिशुविहार बालक मंदिराची विद्यार्थिनी ममता कुलकर्णी हिने पद्य म्हटले. गायत्री जोशी हिने ...

---

# भारत वगळता चीनचे इतरांशी सामंजस्य

## संजय कुलकर्णी : मुंजे व्याख्यानमालेत व्यक्त केले मत

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक** : चीनने भारत आणि भूतानचा अपवाद वगळता सर्व देशांशी सामंजस्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे कुरापती काढून तणावाचे वातावरण कायम ठेवण्यावर त्याचा भर असतो. त्यांच्या या कुरापतींना उत्तर देण्यासाठी भारत सक्षम आहे, असे प्रतिपादन लेप्टनंट जनरल संजय कुलकर्णी यांनी केले.

सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक धर्मवीर डॉ. बा. शि. मुंजे यांच्या जयंतीनिमित्त येथील रावसाहेब थोरात सभागृहात आयोजित डॉ. मुंजे व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प त्यांनी गुंफले. 'इमर्जिंग थ्रेटस् फ्रॉम नॉर्दरन बोर्डर' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. संस्थेचे सरकार्यवाह डॉ. दिलीप बेलगावकर, महापालिकेचे आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार हे व्यासपीठावर उपस्थित होते. सुरुवातीला दीपप्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात झाली.

यावेळी बोलताना ते म्हणाले, काश्मीर भागातील कारकोरम व्हॅली हा दऱ्याखोऱ्याचा भाग आहे. भारत पाकिस्तान आणि चीनच्या सीमारेषांना जोडणारा हा भाग व्यापाराच्यादृष्टीने मोलाचा असल्याने त्याकडे साऱ्यांचेच लक्ष असते. यातील काही भाग पाकिस्तानने चीनला भेट स्वरूपात दिला आहे. १९८३ च्या दरम्यान जनरल मुर्शरफ असताना सियाचीनच्या काही भागात पाकिस्तानकडून आपल्याला अनेक हल्ले झाल्याचे पाहायला मिळते. यावेळी त्यांनी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी सीयाचिन प्रांतास भेट दिली. त्यावेळचे अनुभवही सांगितले. प्रास्ताविकात डॉ. बेलगावकर यांनी डॉ. मुंजे यांच्या कार्याची माहिती देत सहायक प्राध्यापिका गायत्री जोशी यांनी सूत्रसंचालन केले.




डॉ. मुंजे व्याख्यानमालेत बोलताना लेप्टनंट जनरल संजय कुलकर्णी.

### सैनिकी शिक्षण सक्तीचे असायला हवे

मनपा आयुक्त डॉ.पुलकुंडवार म्हणाले, आपले मन नेहमी भरकटत असते, त्यामुळेच मला वाटते की सैनिकी शिक्षण हे सक्तीचे असायला हवे, जीवनाची वाटचाल करताना स्वयंअध्ययन हा महत्त्वाचा भाग असून त्यात शिस्त ही देखील येते.

### आजचे व्याख्यान

**वक्ते :** लेप्टनंट जनरल विनोद खंदारे

**विषय :** कॉम्प्रेहेन्सिव्ह नॅशनल सिक्युरिटी अँड आत्मनिर्भयता





# नवे शैक्षणिक धोरण अंमलबजावणीसाठी व्हावी एकजूट : डॉ. बेलगावकर

नाशिक, दि. ११ (प्रतिनिधी): ''नाशिक नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल होणार असून विद्यार्थी, प्राध्यापक, शैक्षणिक संस्था अशा सर्वांच्याच हिताचा या धोरणामध्ये विचार करण्यात आला. त्यामुळे विविध शैक्षणिक बाबी समजून घेऊन या धोरणांच्या अंमलबजावणी सर्वांचीच एकजूट हवी आहे. ती काळाची खरी गरज आहे,'' असे प्रतिपादन 'सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी'चे सरकार्यवाह डॉ. दिलीप बेलगांवकर यांनी केले.

जिल्ह्यातील अधिसभेवर निवड झालेल्या प्रतिनिधींचा सत्कार 'सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी'तर्फे 'डॉ. मुंजे इन्स्टिट्यूट'च्या हॉलमध्ये नुकताच करण्यात आला. त्यावेळी डॉ. बेलगावकर



बोलत होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आणि 'महाराष्ट्र नॅचरल गॅस'चे संचालक राजेश पांडे कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. संस्थेच्या नाशिक विभागाचे कार्यवाह 'सीएमए' हेमंत देशपांडे, कोषाध्यक्ष शीतल देशपांडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

यावेळी पांडे म्हणाले, ''जगातील लोकसंख्येचे स्वरूप बदलत असून त्याठिकाणी युवापिढी कमी होताना दिसत आहे. त्या तुलनेत भारतीय विद्यार्थी, तरुणांची संख्या मोठी आहे. ही पिढी म्हणजे भारतीयांची खरी संपत्ती आहे. भविष्यात जागतिक स्तरावर भारतीय विद्यार्थ्यांना 'करिअर'च्या दृष्टीने खूप चांगल्या संधी उपलब्ध होतील. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त जवळपास दीड लाख विद्यार्थ्यांच्या हाती तिरंगा दिला होता. त्याचप्रमाणे 'कोविड' काळात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना आवाहन करत ३३ लाख 'मास्क' निर्माण करून ते गरिबांना वाटले. यांचे विश्वविक्रम नोंदवले गेले. या दोन्ही घटनांमुळे विद्यापीठाचे नाव जागतिक स्तरावर पोहोचले.''

सत्कारार्थींतर्फे मनोगत व्यक्त करताना सावंत यांनी ग्रामीण भागातील शाळांना प्रोत्साहन द्यावे, त्याचप्रमाणे विनाअनुदानित छोट्या संस्थांना मदत करावी. त्यांच्या कर्मचाऱ्यांचे शासनस्तरावर वेतन निश्चिती करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. डॉ. हिरे यांनी पुणे विद्यापीठाचे क्रीडासंकुल उभारणीत पांडे यांचा वाटा मोलाचा असून त्यांचा अनुभव नाशिक, नगर उपकेंद्राचे अन्य शैक्षणिक प्रश्न सोडविताना उपयोगी ठरेल, असे सांगितले. यावेळी सोनवणे, वैद्य, बस्ते यांनीही मनोगत व्यक्त केले. गायत्री जोशी यांनी सूत्रसंचालन केले, हेमंत देशपांडे यांनी आभार मानले.

## प्रतिनिधींचा हृद्य सत्कार

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या राज्यस्तरीय सल्लागार समितीत निवड झाल्याबद्दल तसेच अधिसभा निवडणूक राजकारणाविरहित सर्वांचीच मोट बांधून सर्वांना एकत्रित करत निवडणूक बिनविरोध केल्याबद्दल राजेश पांडे यांच्यासह व्यवस्थापन गटातून निवड झालेले म. गांधी शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. अपूर्व हिरे, गोदावरी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अशोक सावंत, प्राचार्य गटातील डॉ. संपत काळे (मविप्र. कला, वाणिज्य विद्यालय) डॉ. राजेश भांबर (एमजीव्ही फॉर्मसी कॉलेज) खुल्या गटातील बाकेराव बस्ते, सागर वैद्य, विजय सोनवणे, राहुल पाखरे यांचा डॉ. बेलगावकर, देशपांडे यांच्या हस्ते प्रभू रामचंद्राची प्रतिमा देऊन गौरव करण्यात आला.



नाशिक : रक्तदान शिबिरप्रसंगी हेमंत देशपांडे, डॉ. उन्मेष कुलकर्णी, गणपत गायकवाड, संजय कंकरेज, विक्रांत कावळे.

# भोसला सैनिकी महाविद्यालयात रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**नाशिक :** सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक धर्मवीर डॉ. बा. शि. मुंजे यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त भोसला सैनिकी महाविद्यालयातर्फे रक्तदान शिबिर झाले. या शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला. शिबिराचे उद्घाटन व रक्तदात्यांना प्रमाणपत्राचे वाटप नाशिक विभागाचे कार्यवाह हेमंत देशपांडे, संस्थेचे सदस्य नानासाहेब वाणी यांच्या हस्ते केले. या वेळी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष हेरंब गोविलकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उन्मेष कुलकर्णी उपस्थित होते. उपक्रमात डॉ. संजय कंकरेज, गणपत गायकवाड यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. या शिबीरात सीएमए देशपाडे यांच्यासह ४१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

# 'भोसला'च्या विद्यार्थ्यांनी जाणली हुतात्मा अनंत कान्हेरेंची शौर्यगाथा

लोकनामा प्रतिनिधी

**नाशिक :** भोसला मिलिटरी कॉलेजमधील कला, संगणक,जर्नालिझम विभागाच्या विद्यार्थ्यांनी शहीद दिनाचे औचित्य साधत भारतीय स्वातंत्र्यलढ्यात गाजलेल्या विजयानंद चित्रपटगृहास भेट दिली.

वय वर्षे १९ असलेल्या हुतात्मा अनंत कान्हेरे यांनी कृष्णाजी कर्वे आणि गोपाळ देशपांडे यांच्या साथीने विजयानंद नाट्यगृहात नाटक सुरू असतानाच अधिकाऱ्यांच्या गराड्यात असलेल्या कलेक्टर जॅक्सनच्या समोर उभे राहून त्यांच्या छातीत गोळ्या झाडून जॅक्सनचा वध केला. यावेळी विजयानंद, दामोदर चित्रपटगृहाचे संचालक विनय चुंबळे, नाट्यलेखक सुरेश गायधनी, चित्रकार रुचिर पंचाक्षरी उपस्थित होते.यावेळी ही संपूर्ण घटना चित्राद्वारे मांडणारे चित्रकार रुचिर पंचाक्षरी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न चुंबळे, गायधनी यांना विचारत आपल्या शंकांचे निरसन केले. प्राचार्य डॉ. दिनेश नाईक यांच्या संकल्पनेतून हा विचार पुढे आला. इतिहास विभागप्रमुख बी. जे. पांडवे यांनी प्रास्ताविक केले. संरक्षण विभागप्रमुख डॉ. रमेश राऊत यांनी आभार मानले.

---

राहून करताना आढळतात. समर्थांचा संप्रदाय ...

# विद्यार्थीविकासासाठी व्रतस्थ : डॉ. बेलगावकर

**'सेंट्रल हिंदू एज्युकेशन सोसायटी'च्या सरकार्यवाहपदी असलेल्या डॉ. दिलीप बेलगावकर यांनी प्रदीर्घ काळ ज्ञानदानाचा यज्ञ फुलवला. विद्यार्थीविकास केंद्रबिंदू मानून कार्य करणाऱ्या डॉ. बेलगावकर यांच्याविषयी...**

डॉ. दिलीप बेलगावकर यांचा जन्म इगतपुरी तालुक्यातील बेलगाव कुऱ्हेला. त्यांचे वडील पंचक्रोशीतील ... पौरोहित्य करत. बेलगावकर नाशिकमध्ये आल्यानंतर आपल्या मोठ्या भावाकडे शिक्षण होईपर्यंत राहिले. प्रथम रवींद्रनाथ विद्यालयातून सातवीपर्यंत आणि नंतर रुंगटा विद्यालयातून त्यांनी दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. बीवायके महाविद्यालयातून वाणिज्य शाखेची पदवी मिळवली. बालवयात

**माणसं**
नील कुलकर्णी

असल्यापासून ते अभाविप कार्यकर्ते म्हणून काम करत. अभाविपच्या माध्यमातूनच त्यांना रा. स्व. संघाच्या कार्याचा परिचय झाला. संघानेही पुढे त्यांना अनेक महत्त्वाच्या पदांची जबाबदारी दिली. दरम्यान, पदवीनंतर त्यांना 'नासका' बँकेत नोकरी मिळाली. नोकरी करतानाच त्यांनी पदव्युत्तर शिक्षणही पूर्ण केले. डॉ. बेलगावकर यांनी बिटको महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रुजू होत अध्यापनाचा ज्ञानयज्ञ सुरू केला. उद्योग, उद्योजकता हे त्यांचे आवडीचे विषय. अध्यापन काळातच त्यांनी 'नाशिक औद्योगिक वसाहतीमधील महिला उद्योजकांचे विपणन व्यवस्थापन' या विषयावरील पीएच.डीही पूर्ण केली.

संघ स्वयंसेवक म्हणून काम करताना संस्थाने १९९७ मध्ये डॉ. बेलगावकरांना 'भोसला मिलिटरी स्कूल'च्या कार्यकारी समितीवर सदस्य व नंतर पुढे विविध पदांच्या जबाबदाऱ्या सोपवल्या. 'सेंट्रल हिंदू एज्युकेशन सोसायटी'मध्ये खजिनदार, महाविद्यालयीन समिती सदस्य, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, 'डॉ. मुंजे मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट'मध्ये अध्यक्ष, 'भोसला ॲडव्हेंचर फाऊंडेशन'चे अध्यक्ष आणि सचिव आदी महत्त्वाच्या पदांवरील जबाबदाऱ्या त्यांनी लिलया पेलल्या. 'सेंट्रल हिंदू एज्युकेशन सोसायटी'च्या कार्यवाह पदावर असताना डॉ. बेलगावकर यांनी अनेक मोठे निर्णय घेत, संस्थेला उत्कर्षाच्या वाटेवर नेले.

डॉ. बेलगावकरांनी 'भोसला मिलिटरी कॉलेज'चे अध्यक्ष असताना अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'मिलिटरी ट्रेनिंग' सुरू केले. 'डॉ. मुंजे मॅनेजमेंट कॉलेज'च्या प्राध्यापकांसाठी 'ऑन जॉब ट्रेनिंग' कार्यक्रम सुरू केला. 'कॉर्पोरेट' जगात विद्यार्थ्यांना कोणते कौशल्य, ज्ञान लागते, याची प्राध्यापकांना चांगली माहिती होऊ लागली... ते ज्ञान शिक्षणपद्धतीत उतरवून विद्यार्थी घडविण्याचा प्रवास सुरू झाला. साहजिकच उद्योजगतातला हा ... असणारे कौशल्यपूर्ण मनुष्यबळ तयार होण्यास ... विद्यार्थ्यांना शिक्षण संपल्यानंतर लगेच नोकरीची संधी मिळू लागली. १५ विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक याप्रमाणे लक्ष देण्यासाठी 'मेंटॉर मेंटिंग'पद्धती सुरू केली. कुणीतरी पालकांसारखे आपल्या पाठीशी उभे राहून मार्गदर्शन करते, याची जाणीव विद्यार्थिनींना होऊ लागली. शिक्षकांसह विद्यार्थी संस्थेशी भावनिकरित्या जोडले गेले. प्राध्यापकही विद्यार्थ्यांना अभ्यास, करिअर यासह वैयक्तिक मार्गदर्शन करू लागले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासह ते 'करिअर ओरिएंटेड' होत गेले.



संस्थेच्या 'मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट'ची स्थापना झाल्यानंतर तिला नावारूपाला आणण्यासाठी डॉ. बेलगावकरांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले. त्यावेळी नाशिकमध्ये अनेक व्यवस्थापन संस्था होत्या. 'भोसला मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट'ला प्रथम क्रमांकाचा दर्जा प्राप्त करून देणे क्रमप्राप्त ठरलेच, आव्हानही होते. डॉ. बेलगावकर यांनी 'मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट' मध्ये नवनवीन उपक्रम, प्रकल्प अविरत सुरू ठेवले. सरांच्या मार्गदर्शनात 'ईडीसी' अर्थात 'उद्योजकता विकास' विभाग सुरू झाला. आज सरांचे अनेक विद्यार्थी यशस्वी उद्योजक आहेत. डॉ. मुंजे इन्स्टिट्यूटमध्ये सरांच्या संकल्पनेने अन् पुढाकाराने सुरेख हॉल उभारला गेला. 'भोसला ॲडव्हेंचर फाऊंडेशन'साठी त्र्यंबकेश्वरजवळील पेगलवाडीच्या निसर्गरम्य डोंगरावर सुंदर जागा मिळवून देण्यासाठी त्यांनी विशेष आग्रह धरला. अभाविपमध्ये झालेल्या संस्कारांने विद्यार्थीहित कायम केंद्रस्थानी राहिले. नेतृत्वगुणासह वेगळी दृष्टी मिळाली. 'भोसला'ने नेहमीच मला नव्या उपक्रमात साहाय्य, स्वायत्तता दिली. त्या विश्वास अन् मार्गदर्शनावर नवीन प्रकल्प सुरू करू शकलो, हे सांगण्यास सर विसरत नाही.

३५ वर्षे अविरतपणे विद्यादानाचे काम केल्यानंतर उपप्राचार्य आणि प्रोफेसर पदावरून ते निवृत्त झाले. डॉ. मुंजे यांना सैनिकी शिक्षणाचे भारतीय व सैन्याचेही भारतीयकरण अपेक्षित होते. त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी देशभर 'हिंदू मिलिटरी एज्युकेशन शिक्षण संस्थे'च्या माध्यमातून सैनिकी शिक्षण सुरू करण्याचा संस्थेचा मानस डॉ. बेलगावकर यांचाही मानस आहे. डॉ. मुंजे यांच्या सार्धशती सोहळ्यानिमित्त 'एनडीए' परीक्षेसाठी मार्गदर्शनासाठी प्रशिक्षण देणारा पहिला प्रकल्प 'डॉ. मुंजे आर्म फोर्सेस प्रिपेटरी अकॅडमी, अरुणाचल प्रदेश'मध्ये सुरू होतोय. असाच प्रकल्प आसाम आणि छत्तीसगढ राज्यात दृष्टिपथात आहे, असे डॉ. बेलगावकर सांगतात. जीवनातील चढउतार पत्नी आणि पुत्र अन् कुटुंबातील व्यक्तींमुळेच सहज पार करता आल्याचा कृतज्ञता भाव ते व्यक्त करतात. सैनिकी शिक्षण हे साचेबद्ध न राहता त्याचे स्वरूपही काळानुरूप बदलले आहे. सामाजिक माध्यमे, सायबर हल्ले, जैविक युद्ध आदी युद्धासाठी सैनिकी शिक्षणाचे विद्यापीठ सुरू व्हावे, असेही संस्थेचे तसेच बेलगावकरांचे स्वप्न आहे. त्यासाठी त्यांना दै. 'मुंबई तरुण भारत' तर्फे अनेक शुभेच्छा!

९३२५१२०२८...

**मटा अँकर** 'भोंसला'च्या आवारात 'झोपडी'त वास्तव्य; घोड्यावरून रपेट, मान्यवरांच्या गाठीभेटी

# धर्मवीर डॉ. मुंजेंच्या चळवळीचे नाशिकही मुख्य केंद्र


**जितेंद्र तरटे**

jitendra.tarte@timesgroup.com






**नाशिक :** स्वतंत्र आणि प्रबळ राष्ट्रनिर्मितीचा ध्यास उराशी बाळगून आजन्म या निर्मितीसाठी सर्वस्वाचा होम करणारे डॉ. बा. शि. तथा धर्मवीर मुंजे यांचे नाशिक शहराशी अत्यंत जिव्हाळ्याचे ऋणानुबंध राहिले आहेत. कर्मभूमी नागपूर असतानाही हिंदुत्वाच्या विचारसरणीवर आधारलेल्या सैनिकी शिक्षण संस्थेचा पाया त्यांनी नाशिकमध्ये रोवला. बलवान राष्ट्रनिर्मितीसाठी प्रत्यक्ष कृतीचा संकल्पही त्यांनी जगद्गुरू शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांच्या उपस्थितीत नाशिकमध्येच सोडला. नाशिकमधील वास्तव्यही त्यांच्या चळवळीच्या केंद्राचे एक प्रमुख केंद्र होते.

डॉ. मुंजे यांचे हे सार्धशताब्दी महोत्सवी वर्ष. धर्मवीर मुंजे यांची मूळ ओळख नेत्रतज्ज्ञ म्हणून असली तरीही महायुद्धांमधील सहभागानंतर राष्ट्रकार्यातील

**माझं नाशिक**

त्यांच्या सहभागाने नागपूरच्या सीमा ओलांडत विश्वभरातील क्रांतिकार्याशी नाते जोडले. सैनिकी शाळांच्या निर्मितीद्वारे बलशाली राष्ट्राची पायाभरणी करण्याचा संकल्प त्यांनी नाशिकमध्येच सोडला. जगभरातील त्यांच्या कार्यांचा केंद्रबिंदू असणारे सैनिकी विद्यालय सेंट्रल हिंदू मिलीटरी एज्युकेशन सोसायटी तथा भोंसला संस्थेच्या रूपाने येथे साकारले गेले. या महाविद्यालयास देश-विदेशाशी जोडताना त्यांच्या जीवित ध्येयातील चळवळीचे प्रमुख केंद्र म्हणून त्यांच्या वयाच्या साठोत्तरी कालखंडात नाशिक हे महत्त्वाचे स्थान ठरल्याचे संदर्भ 'धर्मवीर डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे यांचे चरित्र' या श्रीमती वीणा बाळशास्त्री हरदास लिखीत चरित्रात ठळकपणे आले आहेत.

➤ पान २ वर

### डॉ. कुर्तकोटींशी भेट

भोसला लष्करी विद्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांना पोहण्यासाठी तलाव असावा, अशी डॉ. मुंजे यांची इच्छा होती. या तलावाचा पायाभरणी सोहळा ८ जानेवारी १९३९ रोजी जगद्गुरू श्रीशंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांच्या हस्ते झाला. डॉ. मुंजेंवरील प्रेमापोटी अमळनेरहून श्रीमान प्रतापशेठ, पुण्यातून न. चिं. केळकर, तर नागपुरहून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार आणि रा. ब. वंडेकर यांची उपस्थिती होती. तलावासाठीच्या सात हजार खर्चापैकी सिंध हैदराबाद येथील यू. जी. थदानी यांनी या वेळी तीन हजारांची देणगी डॉ. मुंजे यांच्याकडे सुपूर्द करीत तलावास 'गंगा तुलसी तलाव' असे नाव देण्याची इच्छा प्रकट केली.

---

९०० किलो रांगोळीचा वापर, १०८ रामनामावली, संपूर्ण वंदेमातरम्

# महाकाय रांगोळीतून `रामचरित्र अन् देशभक्ती`ची झलक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** काडतूस वितळवून साकारलेल्या भोसला सैनिकी स्कूलच्या प्रांगणातील कोदंडधारी राममूर्तीसमोर रामनामचरित्राचा संदेश १०८ नावे रेखाटून करण्यात आला आहे. अमृत महोत्सवी वर्षाचे करण्यात आला. या उपक्रमांसाठी संस्थेच्या विविध युनिटमधील ४० हून अधिक कलाशिक्षकांनी सहभाग नोंदवला. संपूर्ण रांगोळी काढण्यासाठी दीड दिवस लागला, तसेच जवळपास ९०० किलो रांगोळीचा त्यासाठी वापर



### वंदेमातरमचे महत्त्व रांगोळीतून

यंदा या रांगोळीमध्ये संपूर्ण वंदे मातरम् लिहिण्यात आले आहे. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी रचले[ले] आणि गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी प्रथम गायिलेले हे राष्ट्रीय गीत. हे गी

Main Edition | 2023-03-01 | Page- 7
epaper.mahamtb.con

# ‘एनईपी’मध्ये बहुमुखी शिक्षणाकडे नेण्याची ताकद

## भोसला महाविद्यालयात शिक्षण तज्ज्ञ म्हापुसकर साधला संवाद

**नाशिक, दि. २८ : प्रतिनिधी**

नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण(एनईपी) ‘‘विद्यार्थ्यांना एकांगी शिक्षणाकडून बहुमुखी शिक्षणाकडे नेणारे आहे. यामुळे शिक्षण क्षेत्राला नवे वळण मिळणार आहे,’’ असे प्रतिपादन मुंबईतील ‘सृजन कन्सलंटट’ संस्थेचे संस्थापक, शिक्षकतज्ज्ञ डॉ. आनंद म्हापुसकर यांनी केले.

भोंसला मिलिटरी कॉलेजमध्ये शिक्षकांसाठी ‘एनईपी २०२०’ विषयावर डॉ. म्हापुसकर यांचे व्याख्यान नुकतेच संपन्न झाले. संस्थेचे सरकार्यवाह डॉ. दिलीप बेलगावकर, नाशिक विभागाचे सहकार्यवाह नितीन गर्गे, प्राचार्य डॉ. दिनेश नाईक, ‘आयक्युएसी’चे विभागप्रमुख डॉ. भारत गुगाणे व्यासपीठावर उपस्थित होते.



डॉ. म्हापुसकर म्हणाले, ‘‘नव्या शैक्षणिक धोरणामुळे अध्ययन, अध्यापन पद्धती बदलण्याबरोबरच विद्यार्थी, समाजाशी अधिक जवळीक साधण्यास मदत होणार आहे. केवळ पुस्तकरूपी शिक्षण न राहता विद्यार्थ्यांना सर्वच बाबतीत पारंगत तसेच कौशल्याधिष्ठीत होण्यास मदत होणार आहे.

गायत्री जोशी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. गुगाणे यांनी परिचय करून दिला. अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुभाष सावंत यांनी आभार मानले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

### विपुल पर्याय अन् संशोधन संधी

बहुशाखीय शिक्षण महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षण रचनेचे वैशिष्ट्ये आहे, असे नमूद करून म्हापुसकर यांनी आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन हा विद्यापीठाच्या कामाचा मूळ गाभा राहील असे सांगितले. संशोधन, शिक्षण व सर्वसाधारण अभ्यासक्रम अशा विषयांसाठी स्वतंत्र विद्यापीठे अस्तित्वात येणार आहेत. विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांऐवजी यापुढे पदवी देण्याचे अधिकार असलेली महाविद्यालये अस्तित्वात येतील, अशी नवी रचना या शिक्षण धोरणात समाविष्ट आहे.

---

पुण्य नगरी



# भोसला मिलिटरी कॉलेज

भोसला मिलीटरी कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आपल्या भाषण, शिवस्तुती आणि पोवाड्याचे सादरीकरण करून अभिवादन केले. सुरवातीला प्राचार्य डॉ. दिनेश नाईक यांनी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले. रयतेच्या राजा असलेल्या शिवाजी महाराजांनी आपल्या कार्यातून एक आदर्श समाजाला घालवून दिला. त्यांचा आदर्श,कार्य डोळ्यासमोर ठेवूनच आपण सारेजण वाटचाल करत आहोत, राजांचे विचार हे दिशादर्शक असून ते प्रत्येक भारतीयांसाठी प्रेरणादायी असेच राहिले आहे, असे प्राचार्य डॉ.नाईक यांनी आपल्या भाषणात सांगितले. यावेळी कॅम्पस को ऑर्डीनेटर डॉ. संजय कंकरेज, उपप्राचार्य जगदीश भावसार, कॅप्टो रामकुमार नायर, प्रा. डॉ. सुनिल जोशी आदी उपस्थित होते. या अनोख्या सोहळ्यात नेहा भोसले, मैथिली भोसले, शुभम गायकवाड, विनीत भदाणे, ओम मोरे, प्रविण सांगळे यांनी आपल्या भाषणाबरोबरच शिवाजी महाराजांचे बालपणासह विविध प्रसंग पोवाड्यांदवारे सादर केले. या पाचही जणांना संजना शितोळे, गायत्री बानमेरू, अंबरिष शुक्ला, चंचल शेलार यांनी साथसंगत केली. क्रीडासंचालक निरंजन गायकवाड यांनी सत्रसंचालन केले.

Smart Nashik Edition
Feb 21, 2023 Page No. 02

# देवेंद्र बडगुजरचा विशेष सत्कार



नाशिक : भोंसला मिलिटरी महाविद्यालयाच्या देवेंद्र बडगुजर या विद्यार्थ्यास नवी दिल्लीत झालेल्या परेडमध्ये महाराष्ट्र डायरेक्टर सर्व एनसीसी स्पर्धेत प्रथम कमांक मिळाला. त्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बॅनर स्वीकारण्याचा मान त्याला



नाशिक : भोसला सैनिकी महाविद्यालयात महिला दिन साजरा करताना प्राध्यापकवर्ग.

# भोसला सैनिकी महाविद्यालय

**नाशिक :** भोसला सैनिकी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. दिनेश नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्राचार्यांच्या हस्ते सर्व महिला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. प्राचार्य डॉ. नाईक यांनी महिलांसंदर्भात घरात व सामाजिक जीवनात असलेली करुणा व प्रेमळ भाव याचे वर्णन व्यक्त केले. महाविद्यालयाच्या यशात महिलांचा मोठा वाटा आहे, असे गौरवोद्गारही त्यांनी काढले. इंग्लिश विभागाच्या प्रमुख जगताप आणि हिंदी विभागाच्या झेंडे यांनी कवितेच्या रूपात स्त्रीशक्तीचा जागर केला. सर्व उपस्थित महिलांकरिता काही मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन क्रीडा विभागातर्फे करण्यात आले होते. विजेत्यांना प्राचार्यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले. क्रीडाशिक्षक निरंजन गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. नितीन